

# भूगोल, लेख- २

**सदाशिव पाटील,** **शाळा :** बालमोहन विद्यामंदिर, दादर

**प्रकरण २. मानव संसाधन**

विद्यार्थी मित्रांनो,

कोणत्याही राष्ट्राची लोकसंख्या ही त्या राष्ट्राच्या प्रगतीतील एक प्रेरक शक्ती असते. निरनिराळे व्यवसाय करणे, वस्तूंचे उत्पादन करणे, व्यापार करणे, निरनिराळ्या कलागुणांचा विकास करणे ही कार्ये राष्ट्रातील लोक करतात. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी नैसर्गिक संसाधनांप्रमाणेच मानवी संसाधनांचाही उपयोग करून घेणे आवश्यक आहे. देशातील लोकांची वय, शिक्षण, व्यवसाय याबद्दलची माहिती शासनाजवळ असली पाहिजे.

प्रकरणातील महत्त्वाचे मुद्दे-

- जनगणनेची आवश्यकता-
- भारतातील लोकसंख्यावाढ (आलेखवाचन)
- लोकसंख्येचे वितरण
- लोकसंख्येची घनता व त्यानुसार केलेली प्रदेश विभागणी
- लोकसंख्येची वैशिष्ट्ये
- राष्ट्रीय लोकसंख्या धोरण
- लोकसंख्या... एक संसाधन

आपण या प्रकरणाचा प्रश्नोत्तर पद्धतीने अभ्यास करू.

**प्र.-** रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय भरून विधाने पूर्ण लिहा.

१) भारतात सर्वात कमी लोकसंख्या ....... राज्यात आहे. (आसाम, गोवा, सिक्कीम, राजस्थान)

२) ....... हे भारतातील सर्वात जास्त नागरी लोकसंख्या असलेले शहर आहे. (मुंबई, दिल्ली, चेन्नई, कोलकाता)

३) सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतात दर चौ. कि. मी. क्षेत्रात ...... लोक राहतात. (१२४, २१६, ७७, ३२४)

४) भारतातील ....... राज्यात स्त्री-संख्या पुरुष-संख्येपेक्षा जास्त आहे. (पंजाब, केरळ, हरयाणा, कर्नाटक)

**उत्तर-** (१) सिक्कीम (२) मुंबई (३) ३२४ (४) केरळ.

**प्र.-** योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' (लोकसंख्येची घनता) | 'ब' (राज्य) |
|---|---|
| १) अति जास्त घनता | क) जम्मू व काश्मीर |
| २) मध्यम घनता | ख) उत्तर प्रदेश |
| ३) कमी घनता | ग) पश्चिम बंगाल |
| | घ) महाराष्ट्र |

**उत्तर :** (१-ग) (२-घ) (३-क)

**प्र.** खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) कोणत्या परिस्थितीत लोकसंख्या कमी होण्याची प्रवृत्ती दिसते ?

**उत्तर-** खाद्यान्नाचा कमी व अनियमित पुरवठा, रोगराई, भूकंप, अवर्षण इत्यादी नैसर्गिक आपत्तींमुळे लोकसंख्या कमी होण्याची प्रवृत्ती दिसते.

२) स्थलांतर म्हणजे काय ?

**उत्तर-** आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय कारणांसाठी एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात वास्तव्यास जाणे म्हणजे स्थलांतर होय.

३) मानवाच्या कोणत्या बाबी वयोमानाशी संबंधित असतात ?

**उत्तर-** मानवाची कार्यक्षमता, सामाजिक स्थान, शिक्षण, व्यवसाय इत्यादी बाबी वयोमानाशी संबंधित असतात.

**प्र.-** टीपा लिहा.

- **लोकसंख्येची घनता** : एखाद्या प्रदेशाचे क्षेत्रफळ व तेथील एकूण लोकसंख्या यावरून तेथे दर चौरस किलोमीटर क्षेत्रामध्ये किती लोक राहतात, याचे प्रमाण काढता येते. या प्रमाणास 'लोकसंख्येची घनता' असे म्हणतात. सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील लोकसंख्येची घनता ३२४ आहे. पश्चिम बंगाल राज्यात सर्वत्र जास्त लोकसंख्येची घनता तर अरुणाचल प्रदेशात सर्वात कमी आहे.
- **लिंग गुणोत्तर** : एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील पुरुषांची संख्या व स्त्रियांची संख्या या दोहोंमधील प्रमाणास 'लिंग गुणोत्तर' म्हणतात. दर एक हजर पुरुषांच्या संख्येबरोबर स्त्रियांची किती संख्या आहे यावरून लिंग गुणोत्तर काढले जाते. सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतात लिंग गुणोत्तर ९३३ आहे. ते केरळ राज्यात सर्वाधिक आहे.

**प्र.-** भौगोलिक कारणे लिहा.

१) ग्रामीण भागाकडून शहरांकडे लोकांचे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होते.

**उत्तर-**
- ग्रामीण भागात शेतीव्यतिरिक्त रोजगाराच्या संधी कमी असतात.
- तेथे शहरी भागाप्रमाणे शैक्षणिक व इतर सुविधा उपलब्ध असतात.
- शहरी भागात उद्योगधंद्यांचे प्रमाण जास्त असल्याने रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध असतात.
- विविध सुविधा व सोयींमुळे शहरी जीवनाचे आकर्षण वाढत आहे

... म्हणून ग्रामीण भागाकडून शहरांकडे लोकांचे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होते.

२) अतिरिक्त लोकसंख्या देशाच्या विकासात अडथळा निर्माण करते.

**उत्तर-**
- अतिरिक्त लोकसंख्येमुळे नैसर्गिक संसाधनांवर प्रचंड ताण पडतो.
- जीवनावश्यक वस्तूंची मागणी वाढल्याने लोकांना मूलभूत सुविधा पुरवणेही कठीण होते.
- अन्नधान्य व इतर वस्तूंचे उत्पन्न लोकसंख्या वाढीपेक्षा कमी वेगाने होते. त्यामुळे टंचाईची परिस्थिती निर्माण होते.
- अनेक समस्या निर्माण होऊन देशाची आर्थिक प्रगती मंदावत

... म्हणून अतिरिक्त लोकसंख्या देशाच्या विकासात अडथळा निर्माण करते.

**प्र.-** सविस्तर उत्तरे लिहा.

१) जनगणनेची आवश्यकता स्पष्ट करा.

**उत्तर-**
- शासन ठराविक काळाने देशातील लोक, त्यांचे लिंग, वय, शिक्षण, व्यवसाय इत्यादींची गणना करते, त्यास 'जनगणना' म्हणतात.
- भारतात जनगणना दर दहा वर्षांनी केली जाते.
- देशात उपलब्ध असलेल्या विपुल मानव संसाधनांचा उपयोग करून घेणे आवश्यक आहे.
- जनगणनेमुळे देशातील खाद्य व इतर उपभोग्य वस्तूंचे उत्पादन सर्व लोकांस पुरेल की नाही याचा अंदाज करता येतो.
- नजीकच्या भविष्यात कोणत्या योजना आखल्या पाहिजेत याविषयी शासनाला मार्गदर्शन मिळते.
- जनगणनेमुळे देशातील लोकांच्या मूलभूत गरजांची पूर्तता तसेच नोकऱ्या इत्यादींबाबत शासनाला योग्य उपाययोजना करता येते

... या सर्व बाबींसाठी जनगणनेची आवश्यकता आहे.

२) भारताचे राष्ट्रीय लोकसंख्या धोरण स्पष्ट करा.

**उत्तर-**
- भारतातील लोकसंख्यावाढ व त्यामुळे निर्माण झालेल्या गंभीर समस्या ही चिंतेची बाब आहे.
- लोकसंख्या नियंत्रणासाठी भारतात लोकसंख्या धोरण आखण्यात आलेले आहे. या धोरणात पुढील बाबी समाविष्ट आहेत.
- जन्मदर नियंत्रित करणे
- अर्भक मृत्यूदर कमी करणे.
- विवाह वयोमर्यादा कायद्याची अंमलबजावणी करणे.
- असाध्य रोगांवर नियंत्रण ठेवणे.
- शैक्षणिक स्तर उंचावणे.

देशाच्या विकासासाठी 'स्थिर लोकसंख्या' हे उद्दिष्ट साध्य व्हावे म्हणून प्रयत्न करण्यात येत आहेत.

**टीप :** विद्यार्थ्यांनी करावयाच्या सरावासाठी पुढील प्रश्न.

**प्रश्न :** पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) भारतातील लोकसंख्येच्या वय संरचनेची माहिती लिहा.

२) 'लोकसंख्या... एक संसाधन' स्पष्ट करा.

**प्रश्न :** टीपा लिहा.

१) भारतातील लोकसंख्या वितरण

२) देशांतर्गत स्थलांतर

**उद्याचा विषय : मराठी**

लोकसत्ता यशस्वी भव! दहावी अभ्यास मालिका

**संपर्क :** yashasvibhava2007@gmail.com